जा.क्र.प्राफसंके/बांधकाम/1589/२०१९,
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग.
दिनांक 10 JUN 2019

प्रत,

..........................................
..........................................
..........................................

**विषय:– ठेका पध्दतीने तारतंत्री/वीजतंत्री नियुक्ती करणेबाबत...**

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले येथे तारतंत्री/विजतंत्री या पदाची ठेका पध्दतीवर तात्पुरती नेमणूक करणेकरीता सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. अर्हताधारक उमेदवारांची खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरती ठेका पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे. सदर ठेका पध्दतीने काम करुन इच्छिणाऱ्या उमेदवारांनी त्यांची शैक्षणिक अर्हता, कामकाजाचे अनुभव आणि अपेक्षित वेतन इंत्यादी बाबी नमूद करुन त्यांचे अर्ज/दरपत्रक **दिनांक** २४/०६/१९ पर्यंत सादर करावेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | तारतंत्री/विजतंत्री | १ | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या तारतंत्री/विजतंत्री व्यवसाय अभ्यासक्रम उत्तीर्ण आणि सक्षम प्राधिकाऱ्यांचा संबंधित व्यवसायाचा परवाना |

वरील तात्पुरती नेमणूक खालील अटी व शर्तींना अधिन राहून करण्यात येत आहे.

१) सदरची नेमणूक निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.
२) इच्छूक उमेदवारांनी आपला प्रती महिन्याचा दर दरपत्रकात नमुद करावा.
३) दरपत्रकासोबत सर्व आवश्यक शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रती तसेच रहिवाशाचा पुरावा छायांकित प्रतीसह जोडणे आवश्यक आहे.
४) सदर तात्पुरता ठेका, कामाचा उरक आणि अचुकता इत्यादी बाब समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्वसुचना न देता सदर ठेका रद्द करण्यात येईल.
५) संबंधित उमेदवाराने ठेका संपण्यापूर्वी सदर ठेका रद्द करावयाचा असल्यास त्याने तशी आगाऊ सुचना देणे आवश्यक आहे. जर तशी आगाऊ सुचना न दिल्यास संबंधिताकडून एक महिन्याचा मेहनताना वसूल करण्यात येईल आणि अशा व्यक्तीचा ठेका भविष्यात विचारात घेतला जाणार नाही.
६) कामकाजाचे स्वरुप पाहून सदर ठेका सुरु ठेवावा किंवा कसे अथवा कोणतेही कारण न दाखवता केव्हाही समाप्त केला जाईल.
७) सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी – ५४५३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरुपी नोकरी मिळणेबाबत हक्क राहणार नाही.
८) वीजतंत्री म्हणून काम करण्यासाठी लघुत्तम प्राप्त दराचा ठेका स्विकारण्यात येणार असून प्रत्यक्ष या कार्यालयात/प्रक्षेत्रावर काम करताना झालेल्या इजा/दुखापती किंवा अपघात यांस हे कार्यालय कोणत्याही प्रकारची जबाबदारी स्विकारणार नाही.
९) कोणतेही प्राप्त दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे बाबतचे तसेच कोणतेही कारण न देता सदरील प्रक्रिया रदद करणेबाबतचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांनी राखून ठेवले आहेत.

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले,
ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग